लोकमान्य टिळक म्युनीसीपल मेडीकल कॉलेज,
व्यवसायोपचारशास्त्र विभाग,सायन,मुंबई

व्यवसायोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१७/ प्र.क्र.४०८/१७/शिक्षण-२,
**दिनांकः- १२ ऑक्टोबर,२०१७**

वाचा:-१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/पीजी/१३३३/२०१६, दिनांक ३०.१२.२०१६.

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/व्यवसायोपचारशास्त्र/पीजीा/वाढ/एलटीएमसीमुंबई/युजी-१६/२०१७/२-अ, दि.१९.०९.२०१७

प्रस्तावना:- लोकमान्य टिळक म्युनसिपल मेडीकल कॉलेज, व्यवसायोपचारशास्त्र विभाग, सायन, मुंबई या महाविद्यालयातील Master in Occupational Therapy या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता ०५ वरुन ०८ विद्यार्थी प्रती वर्ष वाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाची शिफारस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी उपरोक्त संदर्भ क्र.(१) अन्वये शासनास केली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सक्षमता तपासणी करुन उपरोक्त संदर्भ क्र.(२) अन्वये अहवाल शासनास केला आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची शिफारस तसेच संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शासनास सादर केलेला सक्षमता तपासणी अहवाल या बाबी विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय:- लोकमान्य टिळक म्युनीसिपल मेडीकल कॉलेज, सायन, मुंबई या महाविद्यालयातील Master in Occupational Therapy या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत ०५ वरुन ०८ विद्यार्थी प्रती वर्ष वाढ करण्यास सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१) सदर महाविद्यालयातील Master in Occupational Therapy विषयातील व्यवसायोपचारशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता शासनाने निर्धारित केल्यानुसार ०८ एवढी राहील.
२) राज्य शासन/ केंद्र शासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.



Assoc. Prof. & In-Charge
Occupational Therapy Dept
L.T.M.M.C. & L.T.M.G.H.,
Mumbai - 22

३) शासकीय नियम/ कायदा आणि मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

५) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण प्राप्त झाल्याखेरीज सदर जागांवर प्रवेश करण्यात येऊ नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुरेन्द्र प्र.चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वै.शि.)/ मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई.
मा. विरोधी पक्षनेता,विधान परिषद यांचे स्विय सहायक, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे स्विय सहायक, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण / शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू.) मुंबई-५१.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
प्राचार्य, लोकमान्य टिळक म्युनीसिपल मेडीकल कॉलेज,सायन,मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२)

Assoc. Prof. & In-Charge
Occupational Therapy Dept
L.T.M.M.C. & L.T.M.G.H.,
Sion, Mumbai - 22